स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी
सादर करावयाची शोध प्रबंधाचा आराखडा

: संशोधन शीर्षक :

लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासात उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर जिल्हा) 2005 ते 2015

संशोधक

नेलवाडे महेश शिवाजीराव

एम.ए.बी.एड. एम.फिल

मार्गदर्शक

प्रा.डॉ.लक्ष्मण एच. पाटील

एम.ए. पीएच्.डी.

अर्थशास्त्र विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

मार्च २०१६

प्रस्तावना :

औद्योगिक उत्क्रांतीमध्ये यंत्राच्या साह्याने उत्पादन करताना यंत्रशास्त्रात चाकांचा शोध मुलभूत मानला जातो. राज्यशास्त्रात मत जसा मुलभूत शोध मानला जातो. तसाच अर्थशास्त्रात पैशाचा शोध मुलभूत मानला जातो. पैशाच्या उत्क्रांतीचा संबंध हा मानवाच्या उत्क्रांतीशी संबंधीत आहे. इतर शास्त्रातील शोधाप्रमाणे पैशाचा शोध कोणत्याही शास्त्रज्ञानी किंवा अर्थतज्ञानी लावलेला नाही. तर मानवाने स्वत:ची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रगती करुन घेताना त्याच्या आर्थिक व्यवहारात त्याला ज्या अडचणी आल्या त्याच्यावर मात करण्यासाठी मानवाने पैशाचा शोध लावला.

जवळपास ४००० वर्षापूर्वी पैशाच्या देवाण घेवाणीला सुरूवात झाली. सुरूवातीला वस्तुविनिमय या तत्वावर विनिमय सुरू झाला. यात अनेक अडचणी आल्यामुळे मानवाने काही ठराविक वस्तुंची पैसा म्हणून निवड केली. प्रारंभीच्या काळात गारगोटी, शंख, शिंपले, कातडी, झाडाच्या साली, पक्ष्यांचे पंख यानंतर धातू पैसा यात लोह, तांबे, चांदी, सोने यांचा वापर व आज कागदी चलन (नोटा), नाणी, चेक पैसा या स्वरूपात पैसा विनिमयाचे माध्यम म्हणून स्वीकारला गेला. रॉबर्टसन हे अर्थतज्ञ असं म्हणतात की, “इतर वस्तुच्या बदली जी वसतू घेण्यास सर्व तयार असतात किंवा आर्थिक व्यवहारातील देणी फेडण्यासाठी ज्या वस्तूचा उपयोग होतो ती वस्तू म्हणजे पैसा होय.”

म्हणूनच असे म्हटले जाते की,

“माना की पैसा खुदा नहीं है ।

खुदा की कसम पैसा खुदा से कम नहीं है ।”

आज संपूर्ण जग २१ व्या शतकामध्ये वावरत आहे आणि त्या दृष्टीने या देशांची सर्वच क्षेत्रात वाटचाल सुरू आहे. कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये आर्थिक प्रगती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. आर्थिक प्रगती मोजण्याचे माप म्हणजे बँक होय. एका अर्थशास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की, “एखाद्या देशाची आर्थिक स्थिती कशी आहे हे जर जाणून घ्यायचे असेल तर त्या देशातील बँकाचा अभ्यास करा. ज्या देशातील बँका समृद्ध तो देश समृद्ध असे समजा. बँकाचा अभ्यास म्हणजेच पैशाच्या देवाणघेवाणीच्या व्यवहाराचा अभ्यास होय. देशातील पैसा

बँकामार्फत एकत्र केला जातो व तो बँकामार्फतच वितरीत केला जातो. बँकाचा विकास म्हणजे राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा विकास होय.”

बँकेची उत्क्रांती म्हणजे बँकेची सुरूवात कशी झाली ? केव्हा झाली ? व त्यांची वाढ आजपर्यंत कशी होत गेली हे जाणून घेणे होय. पैशाची देवाण घेवाण ४००० वर्षापुर्वी बॅबीलोन संस्कृतीमध्ये अस्तित्वात होती असे मानले जाते. त्याकाळी पैसा सुरक्षित रहावा, कुणी चोरी करु नये म्हणून सुरक्षित ठिकाणी ठेव असावी असे वाटत होते आणि हे खात्रीचे सुरक्षित ठिकाण म्हणजे मंदिरे होत. त्यामुळे लोक पैसा मंदिरातील पुजाऱ्याजवळ ठेवू लागले. कारण मंदिरातील पुजारी त्याकाळी श्रद्धास्थानी होते. पैशाच्या देण्याघेण्याचे व्यवहार मंदिरामध्ये सुरू झाले व मंदिरातील पुजारी बँकेचे जन्मदाते ठरले. देवळात चाललेला हा पैशाचा व्यवहार बघुन खाजगी व्यक्तींनीही व्यवहार सुरू केले. हे पैशाचे व्यवहार करणाऱ्या ज्या व्यक्ती पुढे आल्या त्या म्हणजे व्यापारी, सोनार व सावकार होत. म्हणूनच क्राऊचर या लेखकाने त्याच्या “Outline of Money” ह्या पुस्तकात असे म्हटले की, “व्यापारी, सावकार, सोनार व पुजारी हे आजच्या आधुनिक बँकेचे पुर्वज होत.”

याच काळात युरोपियन देशांमध्ये ज्यू व ख्रिश्चन लोकांच्या पैशाच्या व्यवहारामुळे १२ व्या शतकात बँक व्यवसायाने बाळसे धरले व या व्यवसायाला बँकेचे खरे स्वरूप प्राप्त झाले. याचाच परिणाम म्हणून सार्वजनिक बँक स्थापन होऊन होऊन ‘बँक ऑफ व्हेनस’ ही बँक १२५७ मध्ये स्थापन झाली. १४०१ मध्ये ‘स्पेन बँक ऑफ बर्सीलॉस’ ही सार्वजनिक तर १४०७ मध्ये ‘बँक ऑफ जिनिव्हा’ चा जन्म झाला. बँक ऑफ व्हेनस व बँक ऑफ जिनिव्हा या दोन मोठ्या बँका १८ व्या शतकापर्यंत व्यवसाय करीत होता.

भारतामध्ये सुद्धा बँक व्यवसायाचा जन्म ३००० वर्षापूर्वीच झाला असे मानले जाते. ३००० वर्षापूर्वी कर्ज घेण्याचे व्यवहार होत असत. याचे पुरावे आपल्याला कागदोपत्री पहावयास मिळतात. उदा.कौटिल्याच्या अर्थशास्त्रात त्या काळी व्यापारी सावकारांच्या संस्था अस्तित्वात होत्या. भारताबरोबर व्यापार करण्याकरिता ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना इंग्लंडमध्ये करण्यात आली. यांनी मुंबई, कलकत्ता इ. ठिकाणी एजन्सी हाऊसेस स्थापन करून व्यापाराबरोबर आधुनिक बँक व्यवसाय सुरू केला. १८४० मध्ये भारतात बँक ऑफ हिंदूस्थान

ही पहिली बँक स्थापन करण्यात आली. नंतर दि बँक ऑफ बेंगाल, बँक ऑफ बॉम्बे, बँक ऑफ मद्रास तर १८६५ मध्ये बँक ऑफ अलाहाबादची स्थापना करण्यात आल्या. इ.स.१९१४ नंतर अनेक बँका स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी सेंट्रल बँक ऑफ इंडिया होय. १९२० मध्ये भारतात बँकाची संख्या ६१ होती तर १९४० मध्ये ६६१ झाली. १९६० मध्ये ती घटून ३६१ एवढी राहिली.

काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, Bank या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती Banco या इटालियन शब्दापासून झाली असावी. Banco या इटालियन शब्दाचा अर्थ 'बाक' असा आहे. पूर्वी इटलीमध्ये लोंबार्डी रस्त्यावर राहणारे ज्यू लोक बाकावर नाण्यांची अदलाबदल करणे, पैसे कजाऊ देणे, ठेवी स्वीकारणे इ. साठी वरील प्रकारची कार्ये करीत असल्याने Bank या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती Banco या शब्दापासून झाली असावी असे म्हटले जाते. तसेच जे.डब्ल्यू. गिलबर्ट यांच्या मते, Bank या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती Monte या इटालियन शब्दापासून झाली आहे.

संशोधनाची निवड :

भारतातील इतर भागांप्रमाणेच महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातसुद्धा बँकाचे जाळे पसरलेले आहे. या बँका आपल्या विविध योजनांच्या माध्यमातून जनतेपर्यंत सेवा पोहोचविण्याचे कार्य करत असतात. जिल्ह्याच्या आर्थिक विकासात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून त्यात उस्मानाबाद जनता सहकारी बँक महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे या बँकेचा अभ्यास करणे संशोधकाला आवश्यक वाटले. त्यामुळे लातूर या अभ्यास क्षेत्राची निवड केली गेली आहे.

संशोधनाचे महत्त्व :

प्रत्येक राष्ट्राच्या आर्थिक विकासात बँका फार महत्त्वाची जबाबदारी उचलीत असतात. अर्थव्यवस्थेतील एकूण पैशाचा फार मोठा भाग त्यांच्याकडे जनतेकडून ठेवीच्या रूपाने आलेला असतो. यामुळे बँका राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा वेग, दिशा व स्वरूप यांच्यावर दूरगामी परिणाम करू शकतात. सर्वसामान्य जनता व्यापार करणाऱ्या व्यक्ती तसेच उत्पादक यांच्या दरम्यान महत्त्वाचा दुवा म्हणून बँक महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असते. सर्वसामान्य

लोकांसमोर असलेला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कमावलेला पैसा सुरक्षित राहील किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर बँक देते. एवढेच नव्हे तर पैशाच्या सेवेशिवायही इतर सेवा बँका गिऱ्हाईकांना उपलब्ध करून देतात. जनतेकडे असलेला पैसा बँकेकडे येत असल्यामुळे बँका हा पैसा ज्या व्यक्तींना गरज आहे अशा व्यक्तींना कर्जाऊ देते. अशा रितीने एकाच वेळी सावकार व कर्जदार अशा दुहेरी भूमिका वठविते. एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भांडवलाचा ओघ प्रवाहित केला जातो. त्यामुळे उत्पादनासाठी नवीन उद्योगधंद्यांना चालना मिळते. बँक व्यवसाय पद्धतीमध्ये प्रत्यक्ष चलनाचा उपयोग फारच कमी होत असल्यामुळे पैशाचे व्यवहार खूप होत असूनही प्रत्यक्ष रोख पैसा मात्र कमी प्रमाणात वापरला जातो. कारण बँकेचे व्यवहार धनादेश, ड्राफ्ट, हुंड्या वगैरे मार्फत होत असतात. अशा प्रकारच्या व्यवहारामुळे पैशाची खरेदीशक्ती वाढते. यामुळे या प्रक्रियेचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. त्यामुळे या विषयाचे महत्त्व असणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे लातूर जिल्ह्याच्या विकासातील योगदान अभ्यासणे.

२) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

३) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेच्या विविध योजना व पतपुरवठा धोरण अभ्यासणे

४) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेची कर्जवसुली पद्धत व उत्पन्न अभ्यासणे.

५) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेमार्फत मिळणारे रोजगार अभ्यासणे.

६) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेच्या समस्या व उपाययोजना अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके

१) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेमुळे जनतेला योग्य सवलतीत कर्जपुरवठा होतो.

२) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेमुळे जनतेच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण होते.

३) उस्मानाबाद जनता सहकारी बँकेमार्फत पैशाची ठेव व सुरक्षिततता दिली जाते.

४) सावकारीच्या व्याजदर जाचातून जनतेची सुटका बॅकेने अल्प व्याजदर ठेवून केली आहे.

५)	उस्मानाबाद जनता सहकारी बँकेच्या कर्ज वितरणातून औद्योगिक मदतीतून, कृषी सहाय्यातून व तारण ठेवीतून जनतेचे हीत साधते.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्ह्यातील उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे क्षेत्र ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती असून इ.स.२००५-२०१५ पर्यंतच्या कालावधीचा अभ्यास ही या संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील उस्मानाबाद जनता सहकारी बँकेची निवड करण्यात आली असून यासाठी बँकेचे वार्षिक अहवाल, ऑडिट रिपोर्ट, वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या सर्वसाधारण सभांचे अहवाल इत्यादींचा वापर करण्यात येणार असून प्रकाशित, अप्रकाशित शोधप्रबंध, इंटरनेट, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, संबंधित बँक शाखेतील कर्मचारी, व्यवस्थापक यांच्या मुलाखतीद्वारे माहिती मिळवून आकडेवारी मिळवून त्यांचे विश्लेषण करण्यात येईल. ही आकडेवारी अधिक स्पष्ट करण्यासाठी नकाशे, छायाचित्रे, आलेख पद्धतीचा वापर करण्यात येईल.

साहित्य पुनरावलोकन :

१.	**दिपक जगदिश बजाज** यांनी एम.फिल पदवीसाठी लातूर जिल्हयातील "लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि." लातूरचे कार्य आणि विकासात्मक धोरणांचे अध्ययन या विषयावर शोधनिबंध सादर केलेला आहे. या शोधनिबंधामध्ये लातूर अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेचे गुंतवणूक धोरण व विकासात्मक धोरणाचे अध्ययन केले व या बँकेच्या कार्यप्रणालीचे सुक्ष्म मूल्यांकन केले आहे.

२.	**श्री.एस.जी.पाटील** यांनी "प्रयॉरिटी सेक्टर अँडव्हान्सेस बाय अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकस् इन महाराष्ट्रा ॲन ॲनालिसिस" या लघु शोधनिबंधात भारतातील आणि महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकाचा विकास यांचे विश्लेषण केले आहे.

३.	**विद्याधर अनास्कर** यांनी आपल्या "बँकाविषयी सर्व काही" या लेखमालेत थकबाकीदाराचे नावे कर्ज पहिल्या दिवसापासून एन.पी.ए. होवू शकते आणि बुडित कर्जाचे

निर्लेखन करणे ही सरकारी बँकाच्या दृष्टिने काळाची गरज आहे. असे मत मांडले आहे. यांनी अग्रक्रम क्षेत्रामध्ये कोणकोणत्या उद्देशाने नागरी सहकारी बँकाना अर्थसहाय्य केलेले आहे. याचे विश्लेषण केलेले आहे. तसेच नागरी सहकारी बँकाच्या कार्यप्रणालीतील उणीवा संबंधी महत्त्वपुर्ण शिफारशी केल्या आहेत.

४. **डॉ.पारथो प्रतिम रॉय** यांनी पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला "मॅनेजमेंट ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स" या संशोधन अहवालात नागरी सहकारी बँकाचे व्यवस्थापन नागरी सहकारी बँकासमोरील समस्या जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या नवीन प्रणालीमध्ये नागरी सहकारी बँकाच्या कार्यप्रणालीमध्ये बदलाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. डॉ.राय यांनी नागरी सहकारी बँकाच्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी शिफारशी केल्या आहेत.

५. **डॉ.जे.एफ. पाटील** यांनी आपल्या लघु शोधनिबंधात भारताच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकाची स्थिती आणि भारतातील नागरी सहकारी बँकानी केलेले अर्थसहाय्य व साधलेली प्रगती याचा सहकारी बँकाची १९६१ ते १९८६ या कालावधीत महाराष्ट्रात झालेली प्रगती व विकास यांचे विश्लेषण केले आहे. विविध कारणासाठी केलेला अर्थपुरवठा व नागरी सहकारी बँकाचा प्रगतीतील विभागीय असमतोल यांचेही विश्लेषण या शोधनिबंधात केलेले आहे.

६. **जे.डी.सिल्व्हा** यांचा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग इन महाराष्ट्रा या विषयावरील लघू शोधनिबंध संपादित केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात जे.डी.सिल्व्हा यांना महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकाच्या प्रगतीतील विभागीय असमतोल आणि महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकाचा विकास यांचा अभ्यास केलेला आहे. तसेच लघुउद्योगांच्या विकासात नागरी सहकारी बँकाची भूमिका विविध महत्त्वाच्या उद्देशासाठी नागरी सहकारी बँकानी केलेले अर्थसहाय्य इ. बाबत विश्लेषण केले आहे.

याचबरोबर विविध समित्याचे अहवाल नागरी सहकारी बँकाची कार्यप्रणाली महत्त्व यावर प्रकाश टाकतात.

प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले -

संकल्पनात्मक आराखडा

प्रस्तुत प्रकरणात बँकेचा पूर्व इतिहास, बँकेच्या व्याख्या, बँकेची कार्यपद्धती, व्यवस्थापन अभ्यासण्यात येईल.

प्रकरण दुसरे -

लातूर जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक रचना

या दुसऱ्या प्रकरणात अभ्यास क्षेत्राची सामाजिक व आर्थिक रचना अभ्यासण्यात येईल.

प्रकरण तिसरे -

साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण चौथे -

उस्मानाबाद जनता सहकारी बँकेची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरण तीनमध्ये उस्मानाबाद जनता सहकारी बँकेची स्थापना, वाढ, विकास आणि पार्श्वभूमी आदि घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे -

उस्मानाबाद जनता सहकारी बँकेची कार्यपद्धती, पतपुरवठा व विविध योजना

संशोधनाच्या या चौथ्या प्रकरणात उस्मानाबाद जनता सहकारी बँकेची कार्यपद्धती अभ्यासण्यात येऊन पतपुरवठा व जिल्ह्यातील विविध बँकेतील शाखांच्या विविध योजनांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे -

उस्मानाबाद जनता सहकारी बँकेच्या समस्या

प्रस्तुत प्रकरणात उस्मानाबाद जनता सहकारी बँकेसमोरील समस्या, कामकाजात येणारे अडथळे, शाखांच्या मर्यादा अभ्यासण्यात येतील.

प्रकरण सातवे -

निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात येऊन प्रबंधाच्या शेवटी संदर्भ सूची जोडली जाईल. यात काही परिशिष्टांचाही समावेश असेल.

<u>संदर्भ सूची</u>

१.	बँक व्यवसाय आणि वित्त, पिंपळापूरे अँड कं. पब्लिशर्स पहिली आवृत्ती ऑगस्ट १९९८.	प्रा.पहूरकर बी.बी.
२.	बँक व्यवसायाची मुळ तत्त्वे आणि भारतातील बँका कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे पहिली आवृत्ती जानेवारी १९६६	प्रा.गोखले रामचंद्र महादेव
३.	बँकिंगची तत्वे आणि ग्रामीण विकास विद्या प्रकाशन, नागपूर.	प्रा.अशोक श्री.बोरीकर
४.	सहकाराची रूपरेखा विद्या प्रकाशन, नागपूर	प्रा.सरोदे, प्रा.वनमाली
५.	पैसा व वित्त कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद प्रथम आवृत्ती जुलै २००५	प्रा.डॉ.अहिरराव जितेंद्र डॉ.चांदोरकर सुषमा प्रा.कुलकर्णी विजय डॉ.वाजपायी सुनिता
६.	पैशाचे सिध्दांत आणि पैसाविषयक व्यवहार प्रकाशक हिमालय पब्लिशिंग हाऊस मुंबई, दिल्ली, नागपूर, बैंगलोर, हैद्राबाद	डॉ.देशपांडे

७.	आधुनिक वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन हिमालया पब्लिशिंग हाऊस, रामदुत, डॉ.भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४	प्रा.अष्टीकर प्रा.बावधनकर प्रा.कोपर्डेकर प्रा.क्षीरसागर
८.	बँकिंगची मुलतत्त्वे आणि भारतीय बँक व्यवस्था निराली प्रकाशन	प्रा.डॉ.बेराड रामचंद्र डॉ.कुलकर्णी सर्वोत्तम डॉ.कुलकर्णी लिला

संशोधक

नेलवाडे महेश शिवाजीराव

मार्गदर्शक

डॉ.एल.एच. पाटील